महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – ४४० ०२२
दूरध्वनी क्र.०७१२- २९५९३८१ CIN No. U८५३००PN२०१९NPL१८७४०५ ई-मेल: fellowshipmahajyoti@gmail.com

जावक क्र.महाज्योती/संशोधन विभाग/ 1271 /२०२५-२६, दि. 16/04/2025

## -:परिपत्रक:-

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती योजना सन २०२१,२०२२ आणि २०२३ बॅचमधील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, या कार्यालयाकडे अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यानुसार विद्यार्थी नोकरी/व्यवसाय करत असतानाही, नोकरी करत नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. तसेच वेळोवेळी सहामाही अहवालामध्ये सुध्दा असे प्रमाणपत्र सादर करीत आहेत. त्याचबरोबर सहामाही प्रगती अहवालासोबत जोडण्यात आलेल्या हजेरीपट सुद्धा चुकीचे सादर करून गैरहजर कालावधीत देखील हजर असल्याचे दाखवण्यात येत आहे.

सदरची बाब अत्यंत गंभीर असल्याने सर्व अधिछात्रवृत्तीधारक विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेस (महाज्योती) नागपूर संस्थेस खोटी / चुकीची माहिती सादर केल्याचे आढळल्यास, तक्रार आल्यास महाज्योती मार्गदर्शक तत्वानुसार, आपणास अदा करण्यात आलेली अधिछात्रवृत्तीची सर्व रक्कम वसूल करून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाईल,याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

(प्रशांत वावगे)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व
प्रशिक्षण संस्था (महाज्योती),नागपूर